# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिदिन कार्यक्रम - रक्तदान शिबीर

लोकमत

# साहेबराव बुट्टेपाटील आदर्शवादी व्यक्ती

## सुहास कांबळे । रक्तदान शिबिरात १३४ जणांनी घेतला सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : माजी आमदार साहेबराव बुट्टेपाटील यांनी राजकारणात कृती आणि वृत्ती यांचा आदर्श निर्माण केला असून ते आदर्शवादी चारित्र्यवान व्यक्तिमत्त्व असल्याचे गौरोद्गार प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ व शल्यचिकित्सक डॉ. सुहास कांबळे यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात साहेबराव बुट्टेपाटील यांच्या १९ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, मुरलीधर खांकटे, अ‍ॅड. राजमाला बुट्टेपाटील, अ‍ॅड. गणेश सांडभोर, महादेव ठाकूर, प्राचार्य डॉ.एच.एम.जरे, प्राचार्य डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



शिबिरात सहभागी झालेले रक्तदाते.

स्मृतिदिनानिमित्त क्रीडाज्योत, सर्वधर्मीय प्रार्थना, विज्ञान प्रदर्शन, ग्रंथ प्रदर्शन, भीत्तिपत्रकाचे अनावरण, पोस्टर प्रदर्शन, मराठीतील विविध बोलीभाषांमधील कवितांचे प्रदर्शन रक्तदान शिबिर, हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेमाची शपथ देण्यात आली. या शपथेचे वाचन प्रा. उमेश जगताप यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात सुमारे १३४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. पुण्याच्या ससून रक्तपेढीचे समाजसेवा अधिक्षक अरुण बर्डे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. राजश्री चांदोळकर, डॉ. प्रिया त्रिपाठी, डॉ. सुदेष्ना गजभिये, डॉ. सुकृती ठाकूर सहभागी झाले. या सर्व कार्यक्रमांचे आयोजन हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील विविध विभागांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनसे यांनी केले.

◆ सुहास कांबळे यांनी अपघात झाल्यानंतर रुग्णाला असलेला धोका, रुग्णाचा प्रतिसाद श्वसनाचा मार्ग, शसोच्छ्वास, रक्ताभिसरण याबद्दल माहिती दिली. जखमी रुग्णाची वाहतूक, अस्तिभंग, मणक्याचा अस्तिभंग, झटके, भाजणे, इलेक्ट्रानिक शॉक, हृदयविकार याबद्दल कोणती प्राथमिक खबरदारी घ्यायची या विषयी माहिती दिली. या वेळी डॉ. संदेश कुमार जकाते, डॉ. शैलेजा गायकवाड, अश्विनी पितळे यांनी अपघातानंतर घ्यावयाच्या प्रथोमोपचाराचे प्रात्यक्षिक करुन दाखविले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Jan 05, 2020
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख